आमच्या घरात वाडवडिलांपासून पौरोहित्याच्या व्यवसायाची परंपरा आहे. मी ही तीच परंपरा पुढे चालवत आहे. बाकी या व्यवसायात माझं छान सुरू आहे, मात्र या व्यवसायामुळे काही केल्या माझं लग्न जमत नाहीये. मी आता ३२ वर्षांचा आहे. मी चांगल्या शाळा- कॉलेजमध्ये शिकलो आहे. माझ्याकडे पदवी आहे. तरीही केवळ भटजी नको म्हणून सर्व स्थळांचे नकार येतात. विलास.

- विलास, तुझी परिस्थिती मी अगदी समजू शकते. इतर काहीही कारण नसताना, केवळ व्यवसायावरून लग्न न करण्याचं प्रमाण आपल्या समाजात खूप वाढतंय आणि पौरोहित्य हा त्यातलाच एक आहे. गेल्या कित्येकवर्षांचा माझा अनुभव असा सांगतो, की एखाद्या व्यवसायाला अनुसरून नकार देण्यामागे बहुतेकवेळा गैरसमजच जास्त असतात. जर योग्य संवादानं हे गैरसमज दूर करता आले, तरी परिस्थितीत नक्की चांगले बदल घडवून आणता येतील. तसंच कधीकधी होकार मिळावा म्हणून स्थळापुढे वेगळंच चित्र उभं केलं जातं आणि पुढे जाऊन त्याचं समस्येत रूपांतर होतं. त्यामुळे तुला- तुझ्या घरच्यांना स्थळाशी वेगळ्या पद्धतीने संवाद साधावा लागेल.
- बऱ्याच मुलींना असं वाटत असतं, की पौरोहित्य करणारा मुलगा म्हणजे खूप धार्मिक असणार, रूढी- परंपरांना धरून राहाणारा असणार, घरी सोवळं- ओवळं असेल. कांदा- लसूण खाता येणार नाही. आपल्या कपड्यांवर बंधनं येतील. तो ही नेहमी धोतरच नेसत असेल, तर काय? असे साहजिक प्रश्न मुलींच्या आणि त्यांच्या घरच्यांच्याही मनात असणार. त्यामुळे हे गैरसमज आधी दूर करावे लागतील. तुझ्या व्यवसायाचं स्वरूप कसं आहे, तुझ्या कामाच्या वेळा, सीझन याची योग्य आणि स्पष्ट कल्पना मुलीला देणं गरजेचं आहे. तसंच तुमच्या घरचं वातावरण कसं आहे, तुझा व्यवसाय आणि घरचं वातावरण यांना अनुरूप होण्यासाठी मुलीकडून तुझ्या- घरच्यांच्या काय अपेक्षा आहेत याबद्दल तिला सविस्तर सांगता आलं पाहिजे. मुख्य म्हणजे हे सांगताना त्यात कसलीही लपवाछपवी नको. सध्याच्या परिस्थितप्रमाणेच तुझ्या व्यवसायाचं भविष्य काय असेल, तुझं उत्पन्न काय आहे, नोकरीप्रमाणे प्रमोशन, इन्शुरन्स, प्रॉव्हिडंट फंड यांच्या सोयी तुझ्या व्यवसायात नसणार, मग त्यासाठी तू काही बचत- गुंतवणूक करतोस का हे ही सांगता आलं पाहिजे. पुढे जाऊन हाच व्यवसाय वाढवण्याचा किंवा दुसरं काही करायचं असेल, तर तसा तुझा विचार आहे का याचीही कल्पना देता आली पाहिजे. यामुळे भटजी म्हटल्यावर डोळ्यापुढे उगाच जे चित्र उभं राहातं त्याच्या जोडीला तू आजच्या युगातला तरुणही आहेस असं तिला वाटेल. अशाप्रकारे सविस्तर आणि मोकळेपणाने माहिती दिल्यास समोरच्यांचा दृष्टीकोन नक्की बदलू शकतो.
- विलास, आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, समोरच्यांनी तुझ्या व्यवसायाकडे आदरानं पाहावं असं वाटत असेल, तर आधी तू स्वतःसुद्धा या व्यवसायाचा आदर करायला हवा. आपल्या देशात कुठेही गेलं, तरी कोणतंही धार्मिक कार्य पौरोहित्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. जगात येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या मंदीचा त्यावर परिणाम होऊ शकत नाही. आज आयटीसारख्या क्षेत्रांत कितीही पैसा असला, तरी कामाच्या वेळा, ताण यांचे दुष्परिणाम भोगावेच लागतात. तुझं तसं नाही ही कितीतरी जमेची बाजू आहे. जर तू तुझ्या क्षेत्राबद्दल अभिमानानं आणि आनंदानं सांगितलंस, तर एखाद्या अनुरूप मुलीवर त्याचा सकारात्मक परिणाम होईल असं मला ठामपणे वाटतं.

मी आणि माझ्या नवऱ्यानं दोन वर्षांपूर्वी केमिस्ट शॉप काढलं. आमचं दोघांचं शिक्षणही याच क्षेत्रातलं आहे आणि नोकरीऐवजी व्यवसाय करावा असं आमचं दोघांचंही स्वप्न होतं. व्यवसाय सुरू केला तेव्हा सगळं सुरळीत होतं, पैसाही व्यवस्थित येत आहे. मात्र, आमचे सतत खटके उडत असतात, कारण आमच्या दोघांच्या कामाच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. मला एखादं काम धडाडीने पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसवत नाही, तर तो त्याच्या वेगाने काम पूर्ण करतो. मी त्याच्यापेक्षा जास्त व्यवहारी आहे, एखादा व्यवहार मी त्याच्यापेक्षा कमी किंमतीत पूर्ण करू शकते, मात्र त्याला ते मान्य होत नाही. व्यवसायात गरजेची असलेली कॅल्क्युलेटेड रिस्क घेणं, नवनवीन संकल्पना राबवणं त्याला सहज जमतं, पण मी खूप कचरते. या खटक्यांमुळे दिवसातला निम्मा वेळ आपापले मुद्दे सिद्ध करण्यात जातोय. मी काय करू? संध्या.

- संध्या, तुला ब्रिटिशांच्या काळात लोकप्रिय लोकप्रिय झालेलं, त्याचं एक धोरण आठवतंय का? ते म्हणजे डिव्हाइड अँड रूल! मी इथं ते अर्थातच तुमच्या कामाच्यासंदर्भात म्हणतीय बरं का! नवरा- बायको जेव्हा एखादं काम एकत्र करायला जातात तेव्हा बऱ्याचदा ते कर्मचाऱ्यांप्रमाणे कमी आणि नवरा- बायको म्हणून जास्त वागत असतात. त्यांचा 'प्रोफेशनल'पणा नाही म्हटलं, तरी थोडासा कमी पडताना दिसतो. त्यामुळे मुळात तुम्ही कामाच्या ठिकाणी असताना एकमेकांशी सहकारी म्हणून बोलायला, वागायला सुरुवात केली, तर बराच फरक पडू शकेल. नवरा किंवा बायको म्हणून आपण पटकन ह्यॅ, तुला काय कळतंय किंवा बघ, तरी मी सांगत होतो... अशी वाक्यं सहजपणे उच्चारतो. मात्र, सहकारी म्हटल्यावर आपण समोरच्या व्यक्तीचाही एखादा दृष्टीकोन असेल हे मान्य करतो. डिव्हाइड अँड रूलवर परत येऊन तुम्हाला सांगायला आवडेल, की तुम्ही कोणत्याही कामात दोघं मिळून गुंतू नका, तर आपापल्या कौशल्यानुसार त्याची वाटणी करून घ्या. तू सांगितलंस त्याप्रमाणे तुझी बलंस्थानं वेगळी आहेत आणि अर्थात त्याचीही! मग, त्या बलंस्थानानुसार कामाची विभागणी करा. एक दिवस बसून, एकमेकांशी मोकळेपणाने बोलून, आपापल्या जबाबदाऱ्या वाटून घ्या. दुसऱ्याच्या कामात नाक खुपसण्याची मर्यादा ठरवून घ्या, कुणी, केव्हा आणि कसा सल्ला द्यायचा, मदत हवी असेल, तर तसं सांगायचं का हे अगदी मोकळेपणानं ठरवून घ्या. उदा. तू जास्त व्यवहारी आहेस, तर हिशोब, अकाउंट्स, नवे करार ही बाजू तू पाहा आणि व्यवसाय विस्ताराची जबाबदारी त्याला दे.
- कोणताही व्यवसाय सुरू करताना तो ही आपल्या जोडीदाराच्या साथीने... म्हटल्यावर सुरुवातीला आपण झपाटल्यासारखे कामाला लागतो. व्यवसाय प्रस्थापित करायचा हे एवढं एकच ध्येय आपल्यासमोर असतं. एकदा तो स्थिरस्थावर झाल्यावर, आपणही त्याला सरावतो आणि मग आधी चांगल्या वाटणाऱ्या एकमेकांच्या गोष्टी खटकायला लागतात. कामाची विभागणी, जबाबदाऱ्या याबद्दल स्पष्ट काय ते ठरलं, की गोष्टी सुरळीत नक्की होतील. शेवटी, आधी टोकदार असलेले कोपरे घासून घासूनच मऊ होतात ना!